# नववी महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद

दिनांक: 26–28 एप्रिल 2025
स्थळ: पालघर, महाराष्ट्र

## संक्षिप्त सारांश

पालघर येथे झालेली नववी महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद तीन दिवस चालली. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील संस्थांचे कार्यकर्ते, महिला नेते, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, तसेच आरोग्य क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी या परिषदेत सक्रिय सहभाग घेतला. महिला आरोग्य, माता मृत्यू, बालविवाह, मासिक पाळी आणि स्वच्छता, आदिवासी महिलांचे आरोग्य, मानसिक आरोग्य, पर्यावरणीय बदल, असंघटित कामगार महिला, ट्रान्सजेंडर समुदायाचे प्रश्न आणि सामाजिक समतेचे मुद्दे या परिषदेत विशेषतः अधोरेखित झाले. सत्रांमध्ये महिलांच्या अनुभवांना थेट ऐकण्यावर भर देण्यात आला. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, माहितीपट, नाटिका यांचा वापर करून चर्चेचे वातावरण अधिक परिणामकारक केले गेले. परिषदेतून महिला आरोग्य हक्कांसाठी ठोस मागण्या आणि शिफारसी मांडण्यात आल्या, ज्यामुळे पुढील लढ्यास दिशा मिळाली.

## परिषदेत सहभागी संस्था आणि मान्यवर

या परिषदेत सांगलीच्या संग्राम संस्थेच्या मीना शेशू मॅडम आणि आरती पै मॅडम, लोकमतचे संपादक वसंत भोसले सर, विद्रोही महिला मंच, VAMP, मुस्कान या संस्थांचे कार्यकर्ते सहभागी झाले. स्थानिक स्तरावर दर्शना जाधव, सरपंच मासवण आणि विष्णू जाधव (सरपंच, चहाडे) यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. सुजाता यांनी संविधान उद्देश वाचन केले, तर वर्षा यांनी सर्वांचे स्वागत केले.

## पहिला दिवस – 26 एप्रिल 2025

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक नृत्य व चळवळीच्या गीतांनी झाली. मनीषा गुप्ते यांनी महिला हक्क परिषदांचा इतिहास सांगितला. आंतरराष्ट्रीय महिला हक्क परिषद सत्तरच्या दशकात सुरू झाली आणि दर तीन वर्षांनी होत असे. 2006 पासून महाराष्ट्रात परिषद सुरू झाली. त्यांनी ज्ञाननिर्मितीवरील ब्राह्मणवादी वर्चस्वावर टीका केली आणि परिषदेत स्थानिक विषय महत्त्वाचे मानले जातात असे अधोरेखित केले.

### सत्र-1 (अध्यक्ष: हिंदवी ताई तुळपुळे)

ग्रामीण आरोग्य, रानभाज्या महोत्सव, श्रमिक मुक्ती, हवामान बदल, जैवविविधतेतील बॅलन्स, पाण्याची टंचाई आणि जंगलतोड यावर चर्चा झाली. महिलांच्या आरोग्याशी यांचे थेट नाते असल्याचे नमूद केले गेले. विकासाच्या नावाखाली धोके निर्माण होत आहेत, त्याविरुद्ध सामूहिक लढा आवश्यक आहे असे सांगण्यात आले. “आरोग्याचे प्रश्न राजकारणात मांडावे लागतात; आंदोलन आणि रस्त्यावर उतरल्याशिवाय बदल घडणार नाही” हे मत अधोरेखित झाले.

## स्थानिक अनुभव

मधुभाई धोंडी (कष्टकरी संघटना, पालघर) यांनी सामूहिक वनहक्कांसाठी दिलेल्या लढ्यांचा उल्लेख केला. पालघर जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था कोलमडलेली असून सरकार फक्त आश्वासन देते असे त्यांनी सांगितले. जंगलतोडीमुळे कुपोषण वाढत आहे, औषधी वनस्पती व भाजीपाला नष्ट झाला आहे, मासेमारी कमी झाली आहे. “हे थांबणार नाही तोपर्यंत आम्ही लढू” असा निर्धार व्यक्त केला.

## माता मृत्यूचे मुद्दे

पालघर तालुक्यातील महिलांनी माता मृत्यूंच्या गंभीर परिस्थितीवर अनुभव मांडले. स्मिताताई यांनी लहान वयातील लग्न आणि लवकर मातृत्व हे मुख्य कारण असल्याचे सांगितले. सूर्यकांत गावित (आरोहन संस्था) यांनी प्रजनन आरोग्यसेवांतील अडचणी मांडल्या. मधु ताई यांनी सरकारी कर्मचाऱ्यांच्या वागणुकीवर तक्रार केली. 26 महिलांपैकी 22 महिला खाजगी वाहनाने डिलिव्हरीसाठी गेल्या होत्या. काही महिलांना प्रसूतीवेळी गैरवर्तन सहन करावे लागले. कीर्ती वारली समाजाने जडीबुटीवर अवलंबून असल्याचे सांगितले. तनुजा हरड यांनी मासिक पाळीतील त्रास अधोरेखित केला. मंगल ताई (मासूम) यांनी मधुमेह व महिलांच्या आर्थिक असमर्थतेवर प्रकाश टाकला. रमाकांत यांनी स्थलांतरामुळे आरोग्य सेवेत होणाऱ्या अडचणी सांगितल्या. ज्योती भोकरे यांनी शहरी भागातील अनुभव सांगितले. प्रभा मिश्रा यांनी कागदपत्रांअभावी योजनांचा लाभ मिळत नसल्याचे अधोरेखित केले.

## बालविवाह आणि त्याचे परिणाम

प्राजक्ता माने यांनी बालविवाहाचे आरोग्यावर होणारे परिणाम स्पष्ट केले. शुभदा देशमुख यांनी बालविवाह रोखण्यासाठी शाळा-कॉलेज स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

## रात्रीचा कार्यक्रम

महिला आरोग्य आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीमार्फत कार्यक्रम झाला.

# दुसरा दिवस — 27 एप्रिल 2025

सुलभा होवाळे (संग्राम, सांगली) यांनी ‘जबरदस्तीत कसली मर्दानगी’ अभियानावर सविस्तर चर्चा केली. मर्दानगीच्या चुकीच्या कल्पनेमुळे स्त्रिया व पुरुष या दोघांवरही नकारात्मक परिणाम होतात हे त्यांनी स्पष्ट केले. हिंसाचार, ॲसिड हल्ले, छेडछाड, मानसिक छळ यावर उदाहरणे दिली. समाजातील ही मानसिकता बदलण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. रॅप सॉंग, सवाल-जवाब, ॲसिड हल्ल्यावर आधारित व्हिडिओ दाखवण्यात आले.

युवतींच्या आरोग्याच्या समस्या अधोरेखित झाल्या. आदिवासी विद्यार्थिनींनी त्यांच्या आहार, रोजंदारी, मासिक पाळीतील अडचणी, पाणी व शौचालयाच्या कमतरतेबद्दल अनुभव शेअर केले. सोनाली यांनी शाळा व सार्वजनिक ठिकाणी शौचालये नसल्यामुळे मुली गैरहजर राहतात असे सांगितले. त्यांनी ‘लघवीचा हक्क’ ही मागणी मांडली.

पर्यावरण आणि शेतीवरील सत्रांमध्ये कल्याण टंक साळे आणि सुषमा (मानवलोक) यांनी रासायनिक शेतीचे दुष्परिणाम आणि सेंद्रिय शेतीचे महत्त्व सांगितले. विजया जोरी यांनी वाढत्या तापमानामुळे कष्टकरी महिलांवर होणाऱ्या आरोग्य परिणामांवर भर दिला.

दुपारच्या सत्रात उल्का महाजन, पौर्णिमा आहेर, जयश्री ताई आणि मधुभाई यांनी महिला आरोग्याच्या प्रश्नांवर आपले विचार मांडले. गरोदर मातांबरोबर केलेले काम, ग्रामसभेत महिला धोरण मांडण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

डॉ. मनीषा गुप्ते यांनी आंतरराष्ट्रीय महिला वर्ष (1975) आणि स्त्री चळवळींच्या प्रवासाबद्दल भाष्य केले. उर्मिला पवार यांनी दलित महिलांच्या अनुभवांना व जात प्रश्नाला स्त्री चळवळीच्या अजेंड्यात आणण्याची गरज अधोरेखित केली. अमोल केळकर यांनी स्त्री चळवळीच्या 50 वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेतला आणि मनुस्मृतीविरोधी भूमिकेचा पुरस्कार केला.

### माहितीपटाचे प्रदर्शन

सूती  चौंडकी  व ताल माहितीपटाचे प्रदर्शन झाले. स्मित वधन (संग्राम, सांगली) यांनी ट्रान्सजेंडर समुदायाच्या आरोग्य हक्कांबद्दल अनुभव मांडले. त्यांनी सर्जरी व आरोग्य सेवांतील भेदभावाविषयी तपशीलवार माहिती दिली. समता विचार प्रसारक संस्थेने 'वंचितांचा रंगमंच' या नावाने नाटिका सादर केली ज्यात लेस्बियन महिलांच्या जीवन हक्कांवर प्रकाश टाकला गेला.

## तिसरा दिवस – 28 एप्रिल 2025

मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रीत झाले. रंजना कान्हेर आणि अनिता खरपडे यांनी आत्महत्यांच्या घटनांबद्दल चर्चा केली. एका विवाहित स्त्रीची आत्महत्या झाल्याची कथा सांगितली गेली, ज्यातून महिलांच्या मानसिक त्रासाचे गांभीर्य स्पष्ट झाले. रेखा डाळिंबे यांनी ताण कमी करण्यासाठी झोप, व्यायाम, छंद, विवेकी विचार या उपायांची शिफारस केली. वैजयंती (जनार्दन संस्था) यांनी मानसिक आजारांबद्दल समुदाय आधारित हस्तक्षेपाचे महत्त्व सांगितले.

अर्जत संस्था (गोवा) यांनी वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांच्या मुलांसोबतचे काम शेअर केले. स्वाती Hui यांनी मासिक पाळीशी संबंधित अंधश्रद्धा मांडल्या. रंजना कान्हेर यांनी मानसिक आजारांना लपविण्याची प्रवृत्ती आणि बुवाबाजीमुळे होणारी फसवणूक स्पष्ट केली. प्रगती (महाराष्ट्र टाइम्स) यांनी माध्यमांची भूमिका अधोरेखित केली. पीसीपीएनडीटी कायद्याचे काम, बालविवाहाचे मुद्दे आणि महिला आरोग्याबाबतचे बातमी कव्हरेज हे माध्यमांचे जबाबदारीचे क्षेत्र आहे असे त्यांनी सांगितले.

## परिषदेतील प्रमुख मागण्या

1. विकास प्रकल्पात महिलांचा सहभाग आवश्यक असावा.
2. पालघर जिल्ह्यात माता मृत्यू कमी करण्यासाठी आरोग्य सेवा सुसज्ज कराव्यात.
3. कागदपत्रांच्या अभावामुळे शासकीय सेवा नाकारू नयेत.
4. फिरते दवाखाने व पाळणाघरे सुरू करावीत.
5. दाई व आरोग्य कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समाविष्ट करावे.
6. शाळा व बसस्टँड येथे स्वच्छतागृह व पाणीपुरवठा करावा.
7. ट्रान्सजेंडर समुदायासाठी आरोग्य सेवा विनामूल्य व कायदेशीर कराव्यात.
8. बालविवाह प्रतिबंधासाठी शाळा/कॉलेज स्तरावर उपक्रम राबवावेत.
9. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन द्यावे.
10. मानसिक आरोग्य सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध कराव्यात.

## समारोप

डॉ. मनीषा गुप्ते यांनी समारोपात परिषदेच्या प्रवासाला निरंतर ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. स्थानिक व कोअर कमिट्यांच्या माध्यमातून पुढील नियोजन केले जाईल. परिषदेतून महिला आरोग्य हक्कांसाठी पुढील दिशा निश्चित झाली. विनिता निमकर यांनी सर्वांचे आभार मानून परिषदेचा समारोप केला.

# Ninth Maharashtra Women's Health Rights Conference

**Date:** 26–28 April 2025
**Venue:** Palghar, Maharashtra

## Summary

The Ninth Maharashtra Women's Health Rights Conference was held in Palghar over three days. Participants included women leaders, grassroots activists, health workers, sarpanches, and representatives from organizations across Maharashtra. The conference addressed a wide spectrum of issues: maternal health, child marriage, menstruation and sanitation, tribal women's health, mental health, environmental challenges, unorganized women workers, and the rights of the transgender community. Testimonies from women formed the core of the proceedings, while cultural programs, documentaries, and plays highlighted lived experiences. The conference concluded with clear demands and recommendations aimed at strengthening women's health rights and ensuring accountability from the state.

## Participants and Dignitaries

Key participants included Meena Seshu and Aarti Pai from SANGRAM (Sangli), Vasant Bhosale (Editor, Lokmat), activists from VAMP, Muskan, and Vidrohi Mahila Manch. Local leaders such as Darshana Jadhav, Vishnu Jadhav (Sarpanch, Chhade), and Sarpanch Maswan were present. Sujata read the Preamble to the Constitution, and Varsha welcomed the participants.

## Day One — 26 April 2025

The program opened with traditional dance and songs of the movement. Dr. Manisha Gupte presented the history of women's health conferences, tracing them from the international women's rights movements of the 1970s to Maharashtra's first conference in 2006. She emphasized the need to challenge Brahmanical dominance in knowledge production and to focus on issues relevant to the local context.

## Session-1 (Chair: Hindavi Tai Tulpule)

Discussions centered on rural health, forest produce festivals, the Shramik Mukti movement, climate change, biodiversity balance, water scarcity, and deforestation. These were linked directly to women's health. The session stressed that health concerns must enter political debates and that movements and protests are essential to achieve justice.

## Local Experiences

Madhubhai Dhondi (Kashtakari Sanghatana, Palghar) highlighted struggles for community forest rights, criticizing government inaction and broken promises. He described how deforestation led to malnutrition, loss of medicinal herbs, and declining fisheries. He declared, "We will continue to fight until this destruction stops."

## Maternal Mortality

Participants highlighted the alarming state of maternal mortality in Palghar: 14–15 deaths per year at the taluka level and 26 deaths recorded in the year following district formation. Smitatai identified early marriage and adolescent motherhood as key causes. Suryakant Gavit (Aarohan Sanstha) spoke of barriers to reproductive healthcare. Madhu Tai reported poor behavior of government staff. Out of 26 women surveyed, 22 had to arrange private transport for deliveries. Some women reported verbal and physical abuse during childbirth. Kirti from the Warli community described dependence on traditional herbs. Tanuja Harad highlighted severe menstrual health issues. Mangal Tai (Masoom) described how 60% of women relied on private medication and only 40% accessed government hospitals due to patriarchal control and economic disempowerment. Ramakant discussed how migration created further health challenges. Jyoti Bhokre explained how urban women also faced barriers to quality care. Prabha Mishra stressed that women often lacked documentation, excluding them from government schemes.

## Child Marriage

Prajakta Mane described health impacts of child marriage: loneliness, physical underdevelopment, and complications during pregnancy. Shubhada Deshmukh emphasized preventive efforts in schools and colleges.

## Evening Program

An awareness session on health and superstition was conducted by the Andhashraddha Nirmulan Samiti.

## Day Two — 27 April 2025

Sulabha Hovale (SANGRAM, Sangli) presented the “Zabardastit Kasli Mardangi” (What Manhood Lies in Coercion?) campaign, critiquing toxic masculinity and highlighting its negative impact on both men and women. She cited examples of domestic violence, acid attacks, harassment, and murders over trivial issues, underscoring the urgency of changing such attitudes. Cultural interventions included rap songs, Q&A, and a video on acid attacks.

Young tribal college girls spoke about their struggles: irregular menstruation, anemia, poor diet due to dependence on daily wages, lack of toilets, and absence of sanitary pad facilities. Sonali demanded the “Right to Urinate” and insisted on toilets in schools and public spaces.

Environmental and agricultural issues were highlighted by Kalyan Tank Sale (Pune) and Sushma from Manavlok, who spoke about the harmful effects of chemical farming and the benefits of organic farming. Vijaya Jori stressed the health consequences of rising temperatures on women laborers.

In the afternoon, Ulka Mahajan, Pournima Aher, Jayshree Tai, and Madhubhai discussed women’s health and the importance of presenting policies in women’s Gram Sabhas for approval.

Dr. Manisha Gupte linked the conference to the 1975 International Women’s Year and stressed how autonomous women’s movements shaped laws and policies. Urmila Pawar emphasized the need to foreground caste in feminist struggles. Amol Kelkar reflected on 50 years of women’s movements, condemning Manusmriti and affirming the centrality of the Constitution.

### Documentary presentation

A documentary (“Suti Chondki and Taal”) was screened. Smit Vadhan (SANGRAM, Sangli) spoke about the transgender community’s fight for health rights, particularly legal recognition and free gender-affirming surgeries. The Samata Vichar Prasarak Sanstha staged a play through “Vanchitacha Rangmanch” emphasizing that lesbian women also have the right to live with dignity.

## Day Three — 28 April 2025

The focus shifted to mental health. Ranjana Kanhere and Anita Kharpade shared cases of suicides among tribal women. A story was told of a married working woman who faced domestic restrictions and suspicion, eventually leading her to suicide. Rekha Dalimbe stressed the need for adequate sleep, exercise, hobbies, and rational thinking to cope with stress. Vaijayanti (Janardan Sanstha) discussed community-level interventions for mental illness.

Arjat Sanstha (Goa) shared work with sex workers and their children. Swati Hui presented harmful menstrual superstitions. Ranjana Kanhere described how mental illness is hidden or attributed to superstition, leading to financial exploitation and inadequate treatment. Pragati (Maharashtra Times) explained the role of media in highlighting health rights issues such as PCPNDT implementation and child marriage.

## Key Demands from the Conference

11. No development project should proceed without active participation of local women.
12. Strengthen maternal health services at the district and taluka levels in Palghar.
13. No government service should be denied for lack of documents.
14. Establish mobile clinics and childcare centers.
15. Formally employ and remunerate dais and rural health workers.
16. Ensure water and sanitation facilities at schools and bus stands.
17. Provide legal, free gender-affirming healthcare services for the transgender community.
18. Strengthen child marriage prevention efforts in schools and colleges.
19. Promote organic farming and food sovereignty.
20. Expand access to mental health services locally.

## Conclusion

In her valedictory address, Dr. Manisha Gupte emphasized that the Women's Health Rights Conference is a continuous journey, not a one-time event. Future planning will be carried forward by local and core committees. The conference reaffirmed its commitment to advancing women's health rights, addressing social inequities, and creating accountability mechanisms. Vinita Nimkar extended a vote of thanks to conclude the event.